अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

रोहित शेट्टी गोळीबारप्रकरण : १४ व्या आरोपीला अटक

मुंबई : बॉलिवूडमधीस प्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या घरावर करण्यात आलेल्या गोळीबार प्रकरणातील आणखी एका आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणातील चौदावा आरोपी असलेल्या गोलू पंडित याला मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने उत्तर प्रदेश एटीएसच्या मदतीने उत्तर प्रदेशमधून ताब्यात घेतले आहे. गोलू पंडित याला मुंबईत आणले जात असून, त्याला

रविवारी न्यायालयात हजर केले जाणार आहे.

रोहित शेट्टी यांच्या जुहू येथील 'शेट्टी टॉवर' या निवास्थानाबाहेर गोळीबार झाल्याची घटना फेब्रुवारी महिन्यात घडली होती. तसेच या घटनेमुळे सिने जगतात एकच खळबळ उडाली होती. हा गोळीबार बिश्नोई गँग कडून करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. तसेच या प्रकरणी पोलिसांनी आरोपींची धरपकड करण्यात आली होती.

www.surajyadigital.com । रविवार, दि. २२ मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १७२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

भोंदुबाबा खरातवर पोक्सो लावा!

पोटाला लावलेले मशीन हळूहळू गेले छातीकडे...

नाशिक/प्रतिनिधी

स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञ आणि 'कॅप्टन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या अशोक खरात याच्या भोंदूगिरीची सर्वत्र चर्चा सुरु आहे. त्याने कित्येक महिलांवरअत्याचार केले. त्यामधील एका महिलेने तक्रार केल्यानंतर अशोक खरातची काळी कृत्ये समोर आली आहेत. आता अशोक खरातचे अल्पवयीन मुलीसंदर्भातील आणखी एक लज्जास्पद प्रकरण समोर आले आहे. खरातच्या नव्या व्हिडिओने खळबळ माजली असून त्याच्याविरुद्ध पोस्को लावण्याची मागणी जोर धरत आहे. या व्हिडीओमध्ये एक अल्पवयीन मुलगी दिसत आहे. यावेळी अशोक खरातने अल्पवयीन मुलीवर इंटरनेट केबल 'टेस्टर' आणि तांत्रिक उपकरणांचा वापर करून फसवणूक केल्याचा सीसीटीव्ही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. उपचाराच्या नावाखाली केलेल्या या अघोरी कृत्याने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.

या प्रकारानंतर अशोक खरातच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. आधीच महिलांच्या लैंगिक शोषण, फसवणुकी आणि राजकीय नेत्यांच्या निकटवर्तीयांशी संबंधित प्रकरणात त्याला अटक झाली आहे. आता अल्पवयीन मुलीवर अंधश्रद्धेच्या नावाखाली केलेल्या या गंभीर फसवणुकींमुळे पोलिसांकडून अतिरिक्त तपास सुरू झाला आहे.

विशेष तपास पथक या नव्या व्हिडीओच्या आधारे खरातच्या इतर भोंदू कृत्यांचा शोध घेत आहे.नाशिक पोलिसांच्या मते, खरातने अशा प्रकारे अनेक महिलांना आणि मुलींना फसवले असण्याची शक्यता आहे. उपचाराच्या नावाखाली इलेक्ट्रॉनिक उपकरणे वापरून लोकांची दिशाभूल करणे ही गंभीर अंधश्रद्धा आणि फसवणुकीची घटना आहे, असे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.या व्हिडीओच्या व्हायरल होण्यानंतर सोशल मीडियावर संताप व्यक्त होत आहे. (अधिक वृत्त पान २ वर...)

अशोक खरातच्या पत्नी म्हणाली

पती व्यावसायिक किंवा तज्ज्ञ ज्योतिषी नाहीत!

एका या वृत्तपत्राशी बोलताना अशोक खरातची पत्नी कल्पना यांनी सांगितले की, माझे पती काही व्यावसायिक किंवा तज्ज्ञ ज्योतिषी नाहीत. खूप जवळच्या

काही सहकाऱ्यांनी त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. त्यांची प्रतिमा उद्ध्वस्त करण्यासाठी हे करण्यात आले आहे.कल्पना खरात यांच्या व्यतिरिक्त कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीने या प्रकरणावर भाष्य केलेले नाही. अशोक खरात याच्या जवळच्या व्यक्तींनीही याबद्दल मौनच बाळगलेले आहे. मात्र, या प्रकरणाने महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. अनेक मोठ्या नेत्यांसोबतचे खरातचे फोटोंनी चर्चांना हवाच मिळू लागली आहे.

भोंदूबाबाची पोलिसांना धमकी; ॐ फट स्वाहा!

बुधवारी पहाटे नाशिक पोलिसांच्या गुन्हे शाखेनं भोंदू आणि लिंगपिसाट अशोक खरात याला अटक केली. दरम्यान यावेळी त्याला पोलीसी खाक्या दाखवताच तो आक्रमक झाल्याचं पहायला मिळालं. त्याने थेट पोलिसांना विचित्र धमक्या देण्यास सुरुवात केली. 'तुम्ही घोर अपराध करत आहात, तुमच्यावर कोप होईल' असं यावेळी तो मोठं मोठ्यानं ओरडून पोलिसांना धमकी देत होता. यावेळी पोलिसांनी त्याला धू-धू धुतल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत अशोक खरात याच्या मुसक्या आवळल्या, त्याला न्यायालयानं २४ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान या अशोक खरात याच्या चौकशीमधून आणखी काही धक्कादायक माहिती समोर येऊ शकते, असा अंदाज देखील वर्तवला जात आहे.

व्हिडीओंची संख्या आता शंभरीपार

खरात याच्या कार्यालयातून पोलिसांनी एक पेन ड्राइव्ह जप्त केला आहे. या पेन ड्राइव्हमध्ये आधी ५८ व्हिडीओ सापडल्याची माहिती समोर येत होती. त्यानंतर तब्बल १०० पेक्षा अधिक व्हिडीओ आढळून आले आहेत. यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी अतिशय गोपनीय पद्धतीने खरात याला अटक केली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार आपल्याला कोणाला अटक करायचं आहे? हे या कारवाईत सहभागी झालेल्या अनेक पोलिसांना शेवटपर्यंत माहितच नव्हतं, पोलिसांनी खरात याला पळून जाण्याची कोणतीही संधी न देता अतिशय शिताफिने त्याच्या मुसक्या आवळल्या.

चाकणकरांकडील प्रदेशाध्यक्षपद कारवाईच्या रडारवर

मंत्री भूजबळ म्हणाले, राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते घेणार निर्णय

महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरुन रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यानंतर आता त्यांचा पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचाही राजीनामा घेणार का? असा प्रश्न राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना



विचारण्यात आला होता. त्यावर, भुजबळ यांनी स्पष्टपणे उत्तर दिले. संवैधानिक पदाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी रुपाली चाकणकरांच्या राजीनाम्याचा निर्णय घेतला. मात्र, पक्षाच्या अध्यक्ष पदाबाबत पक्षाचे वरिष्ठ नेते आणि राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार निर्णय घेतील. संपूर्ण चौकशी करून त्यावर निर्णय होतो, असे देखील त्यांनी यावेळी सांगितले. तर, ज्या महिलांवर अन्याय झाला असेल त्यांनी पुढे येऊन आपली तक्रार दिली पाहिजे, जे अधिकारी नेमले आहेत ते चौकशी करून कारवाई करतील, असे देखील छगन भुजबळ म्हणाले.

मास्टरमाईंड नीरज जाधव

लैंगिक शोषणाचे शेकडो व्हिडीओ

भोंदुबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्य सरकारवर टीका केली जात आहे. या भोंदुबाबाने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्या कृत्याचे १०० हून अधिक व्हिडीओ समोर आले आहेत. विशेष म्हणजे या भोंदुबाबाचे सत्ताधारी पक्षांतील अनेक नेत्यांसोबत फोटो असल्याने विरोधक आक्रमक झाले आहेत. फेब्रुवारी महिन्यात एका महिलेने तक्रार दाखल केल्यानंतर खरात याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या खरात पोलिसांच्या ताब्यात आहे. दरम्यान, या प्रकरणात अनेक खळबळजनक खुलासे समोर येत आहेत. असे असतानाच आता या प्रकरणातील नीरज जाधवचा चेहरा समोर आला आहे.

नीरज जाधव कोण आहे?

कॅप्टन फाईल्स प्रकरणात गेल्या अनेक दिवसांपासून नीरज जाधव कोण होता, असे विचारले जात होते. या नीरज जाधवला पोलिसांनी अटक केली आहे. आता त्याचा फोटो शेवटी समोर आला . हा नीरज जाधव कॅप्टन अशोक खरात याच्या कार्यालयात होता. तो तिथे ऑफिस बॉय म्हणून कार्यरत होता. खरात महिलांचे लैंगिक शोषण करायचा त्यावेळी हाच नीरज जाधव व्हिडीओ रेकॉर्ड करायचा, असा आरोप केला जातोय. त्याने १०० पेक्षा अधिक लैंगिक शोषणाचे व्हिडीओ रेकॉर्ड केल्याचा दावा केला जातोय. त्याचाच फोटो आता समोर आला आहे.

अशोक खरात अन् नीरज जाधव आमने-सामने तपास अधिकाऱ्यांसमोर दोघांमध्ये शाब्दिक खडाजंगी

दरम्यान, या चौकशीदरम्यान अशोक खरातच्या ऑफिसमधील बॉय नीरज जाधव आणि खरात यांची सामोरा समोर चौकशी सुरू होती. या चौकशी दरम्यान कॅप्टन खरात आणि नीरज जाधवमध्ये शाब्दिक खडाजंगी झाल्याची सूत्रांची माहिती आहे. महिला अत्याचार, बलात्कार आणि लैंगिक शोषणप्रकरणी नीरज जाधव आणि कॅप्टन खरात यांची पहिल्यांदाच एसआयटीकडून सामोरा समोर चौकशी करण्यात आली. अशोक खरातचे राजकीय संबंध, तसेच व्यावसायिक मालमत्ता यांची देखील चौकशी करण्यात येत आहे.

'देवगिरी'वर पवार, तटकरे अन् पटेलांची खलबंत चाकणकरांचं प्रदेशाध्यक्षपद राहणार की जाणार?

मुंबईतील देवगिरी बंगल्यावर उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्यात एक महत्वपूर्ण बैठक सुरू आहे. रूपाली चाकणकर यांनी महिला आयोगाचा राजीनामा दिला असला तरी महिला प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा अशी विरोधकांची मागणी असून, अनेक स्तरावर ही मागणी होत आहे. या अनुषंगाने या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. राजकीय दृष्टीने या बैठकीला मोठे महत्व निर्माण झालं आहे. सुनेत्राताई पवार, सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्यातील बैठकीत रुपाली चाकणकर यांच्या संदर्भात काय निर्णय होणार हे पाहावं लागणार आहे.

भोंदू खरातला भर चौकात घाला गोळ्या! : कालीचरण

धाराशिवच्या एका खासगी कार्यक्रमात कालीचरण महाराज म्हणाले, अशोक खरात सारख्या भोंदू बाबांना भर चौकात गोळ्या घातल्या पाहिजेत, या वक्तव्याने धार्मिक आणि सामाजिक वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे.चुकीची कृत्ये करणाऱ्याला त्याच्या कर्माचे फळ नक्कीच मिळते. त्यांनी पुढे स्पष्ट केले की, लोकांनीच एखाद्याला महाराज बनवले असते, पण जर असे महाराज धर्माला कलंक लावत असतील तर ते पापी आहेत.

गॅस टंचाईदरम्यान केंद्राची घोषणा

राज्यांना ५० टक्के कोटा, स्थलांतरित मजुरांसाठीही निर्णय

नवी दिल्ली

इराणमधील युध्दामुळे आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे भारतात एलपीजीचा मोठ्या प्रमाणावर तुटवडा जाणवत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वसामान्यांना दिलासा देणारे काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यानुसार आता केंद्र सरकारने राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठीच्या गॅसचा कोटा वाढवून ५० टक्के केला आहे. तसेच २३ मार्चपासून अतिरिक्त २० टक्के पुरवठा केला जाणार आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहिलं आहे. तसेच २३ मार्चपासून पुढील

सूचनेपर्यंत राज्यांना २० टक्के एलपीजी दिला जाणार आहे. त्यामुळे एकूण कोटा गॅस संकटापूर्वीच्या पुरवठ्याच्या ५० टक्के एवढा होईल.

त्यांनी सांगितले की, २० टक्के अतिरिक्त कोटा हा रेस्टॉरंट, ढाबे, हॉटेल, इंडस्ट्रियल कॅंटिन, फूड प्रोसेसिंग, राज्य सरकार आणि लोकल बॉडीकडून खाण्यासाठी चालवण्यात येणारी अनुदानित कॅन्टिंन, कम्युनिटी किचन, स्थलांतरित मजुरांसाठी ५ किलोचा सिलेंडर देण्यासाठी वापरला जाईल.

त्याबरोबरच सर्व वाणिज्यिक आणि औद्योगिक एलपीजी ग्राहकांना ५० टक्के पुरवठ्यासाठी पात्र ठरण्यासाठी आधी ऑईल मार्केटिंग कंपन्यांकडे नोंदणी करावी लागेल.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

पाणी बी इराण वरनं येणार हाय का ?

सोलापूर शहराचे तापमान

कमाल तापमान ३६.०

कल्याण 189-82-156

इराणच्या हल्ल्याने अमेरिका-इस्त्रायलही हादरले

चार हजार किलोमीटरवरील 'डिएगो गार्सिया' हवाई तळावर डागल्या मिसाईल्स

नवी दिल्ली

अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमधील युद्धाला २० दिवस पूर्ण झाले आहेत. मात्र, अद्यापही हे युद्ध थांबलेलं नाही. अमेरिका-इस्त्रायल रोज इराणवर हल्ले करत आहेत, तर इराणही प्रतिहल्ले करत आहे. या युद्धात आतापर्यंत इराणच्या अनेक मोठ्या नेत्यांचा आणि लष्करी अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याने इराणचं मोठं नुकसान

झालं आहे. पण तरीही इराणने माघार घेतलेली नाही, उलट आता इराणने आणखी आक्रमक भूमिका घेतल्याचं दिसत आहे.

इराणने अमेरिकेवर सर्वाधिक लांब पल्ल्याचा हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. इराणने हिंद महासागरातील अमेरिकेच्या डिएगो गार्सिया हवाई तळावर अनेक मिसाईल्स डागल्याची माहिती सांगितली जात आहे. या हल्ल्यामुळे अमेरिका-इस्त्रायललाही धक्का बसला आहे. कारण एवढ्या लांब अंतरावर इराण हल्ला करेल याचा अमेरिका किंवा इस्त्रायलने विचारही केला नसेल.

इराणने ब्रिटन आणि अमेरिकेच्या हवाई तळांवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे इस्त्रायल हादरला आहे. यावरून इराणच्या क्षेपणास्त्र क्षमतेबद्दल इस्त्रायललाही धक्का बसला आहे. कारण इराणच्या क्षेपणास्त्रांचा पल्ला किती लांबपर्यंत आहे हे अद्याप अधिकृतपणे समोर आलेलं नाही. इराणने डिएगो गार्सिया हवाई तळावर केलेल्या हल्ल्यानंतर इस्त्रायलने तेहरानवरील हल्ले आणखी वाढवण्याची धमकी दिली आहे.

नवीन संस्थेच्या बॉडीवर घेण्याचे अमिष

जास्त परतावा देतो म्हणून १ कोटी १२ लाखांची फसवणूक

बागलकोटच्या माधव जोशी विरूध्द गुन्हा दाखल

सोलापूर/प्रतिनिधी

नवीन संस्थेच्या बॉडीवर घेवून सहा महिन्यात जास्त परतावा देतो म्हणून १ कोटी १२ लाखाची फसवणूक केल्याप्रकरणी माधव येदुनाथ जोशी रा. गलगली ता. बेळगी जि. बागलकोट याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी राघवेंद्र विजयकुमार ज्योती (वय ४८ रा. साखर पेठ, सोलापूर(यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, दि. १५ फेब्रुवारी २०२१ ते दि. १६ मार्च २०२५ या कालावधीत लोकमंगल ऑक्सीपार्क, मुरारजी पेठ येथे यातील आरोपी माधव जोशी हे फिर्यादी राघवेंद्र ज्योती यांच्या ओळखीचे आहेत. त्यामुळे माधव जोशी यांनी राघवेंद्र ज्योती व त्यांचा मित्र अनुप माळवदकर यांना, धारवाड येथील बेलुर इंडस्ट्रिअल एरिया मधील आय. टी.आय. कॉलेज आहे. त्या कॉलेज मध्ये स्कील डेव्हलपमेंट कोर्सेस चालत होते. सदरचे कॉलेज हे एक संस्था चालवित होते. परंतु काही कारणास्थव सदरचे कॉलेज बंद झाले आहे. त्या कॉलेजचे ट्रस्टी हे फिर्यादी राघवेंद्र ज्योती यांच्या ओळखीचे होते. कॉलेज सुरू करण्यासाठी सेंट्रल मिनीस्ट्री ऑफ लेबर दिल्ली

येथून केंद्र शासनाची परवानगीची आवश्यकता आहे. तेथे राघवेंद्र ज्योती यांची चांगली ओळख होती. सदर ठिकाणाहून कॉलेज पुन्हा चालू करण्याची परवानगी मिळाल्यानंतर आपल्याला केंद्र शासनाकडून १० कोटीचे अनुदान मिळेल. त्यानंतर एक नवीन ट्रस्टची स्थापना करून व सदर संस्थेमध्ये आपणास बोर्ड ऑफ डायरेक्टर म्हणून बॉडी मध्ये घेवू. व आपणास संस्थेच्या बॉडी मध्ये घेण्यासाठी १ कोटी इतकी रक्कम गुंतवणूक करावी लागेल. या मोबदल्यात सहा महिन्यात आपल्याला दीड कोटी परतावा मिळवून देतो असे आमिष दाखविले.त्यामुळे आरोपी माधव जोशी याच्या सांगण्यावरून फिर्यादी राघवेंद्र ज्योती व त्यांच्या पत्नीने मिळून धनादेशाव्दारे/बँकव्दारे ४८००००० व मित्र अनुप माळवदकर यांनी रोखीने व धनादेशाव्दारे ६४००००० रूपये असे एकुणा ११२००००० रूपये गुंतवणूक केली. ती आरोपी माधव जोशी यांनी स्विकारली. व ती रक्कम स्वतच्या फायद्याकरिता वापरली. व फिर्यादी व त्यांच्या मित्राला सांगितल्या प्रमाणे दीड कोटी इतकी रक्कम परत दिली नाही.

या फिर्यादी वरून आरोपी माधव येदुनाथ जोशी रा. गलगली ता. बेळगी जि. बागलकोट याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास फौजदार ढेरे हे करित आहेत.